




## श्रीमहाराजांनी साईरूपात दर्शन दिले

श्रीमहाराज १९५०-५५ च्या काळात वारंवार खानू येथे बापुराव खांडेकर यांच्या घरी वास्तव्याला असत. त्यांचे देवस्थानही १९५२ पासून तेथेच होते. तेथे ते सद्गुरूंचे उत्सवही साजरे करीत.


खानूला एक जोशी नावाचे शिक्षक राहात असत. ते साईबाबांचे भक्त होते. त्यांना सतत तीन दिवस स्वप्नात येऊन साईबाबांनी सांगितले की मी खानूला आलो आहे. खांडेकरांकडे माझ्या दर्शनाला ये! सतत तीन दिवस स्वप्न पडल्यामुळे चौथ्या दिवशी ते सकाळी खांडेकरांच्या घरी आले.

खांडेकरांच्या घरी ओटीवर एक मोठा लाकडी पेटारा होता. त्या दिवशी सकाळपासून श्रीमहाराज त्या पेटीवर डोक्याला एक पांढरा फडका बांधून बसले होते. गुरुजी आले आणि पाहतात तो समोर साक्षात साईबाबा! गुरुजी आनंदातिरेकाने रडूच लागले! त्यांनी श्रीमहाराजांचे पाय धरले.

या गुरुजींनी साईबाबांवरील अतिरेकी भक्तीमुळे, साईबाबा मुसलमान होते या समजुतीतून स्वत:चे जानवेसुद्धा तोडून टाकले होते. श्रीमहाराजांनी नंतर त्यांची चांगलीच हजेरी घेतली. साईबाबांचे नाव वैशंपायन होते हे सांगून त्याना अनेक उपदेशपर गोष्टी कथन केल्या.




केप्रे खर्च केला. आंडी कुडी समाधी मंदिराची सर्व व्यवस्था
करून ठेवली. दिगंबर बाबांचा शिष्य सीताराम आत्माराम वाळावल-
कर हा सर्व व्यवस्था पहातो.
सन १९७० मध्ये पावस येथील देसाई मांडे रहाणारे नाडकर्णी
कुल्या उर्फ आप्पा गोडबोले (स्वामी स्वरूपानंद) यांची भेट झाली.
पुढे एक वर्ष २ महिन्यांनी स्वामी स्वरूपानंदांनी त्यांचे गुरूंचे
दृष्टांत अनुसरून त्यांचे सर्व भाविकासह व शंकासह
त्यांनी नाथ संप्रदायाची परंपरा विठोबा राजा म्हणून असताही
विठोबा कडे दिली व मासिक गुरूस आईने हा संप्रदाय
तुम्ही चालवा असे सांगितले. विठोबाने स्वामी स्वरूपानंदांचा
अनुग्रह घेतला नाही. पुढे श्री विठोबा पुणे येथे श्री
सद्गुरु बाबांकडे आला व त्याने सर्व हकीकत त्यांना सांगितली.
त्यावेळी श्री सद्गुरु बाबा म्हणाले आपल्याला कोणाचे काही देणे
घेणे नाही. त्यानंतर बाबा आत्माराम स्वरूप समाधीत होते नंतर
विठोबास म्हणाले विठोबा तुझ्याकडे नाथ आहे ते व पारंपारिक
परंपरा व सद्गुरु पद ठेव. त्यानंतर विठोबाने सन १९८० पर्यंत
त्या संप्रदायाचा आपल्या स्वतः च्या संप्रदाय करून प्रचार
केला. स्वामी स्वरूपानंद हेही सद्गुरु समान मानत त्यांच्या अभंग
ज्ञानेश्वरांच्या प्रसादास बाबा मदत केली आता विठोबाने
ती परंपरा श्री सद्गुरु चरणाजवळ ठेवली आहे. प्रचार करीत
नाही.
सन १९८३ मध्ये विठोबा श्रीसद्गुरु बाबांकडे गेले होते
त्यांना अडचणी सांगून ... ८ दिवस बाबांचे व
त्यांचे प्रेमाचे भांडण झाले कारण श्री सद्गुरु बाबा ३१ जुलै
१९८३ रोजी रात्री देह ठेवणार होते. हे विठोबास
त्यांनी आगोदर ३ वर्षे कळविले होते.




# श्री यशवंत काशीनाथ परांजपे ऊर्फ स्वामी संविदानंद यांची संजीवन समाधी

मावळंगे (रत्नागिरी) येथील यशवंत काशीनाथ परांजपे ऊर्फ दादा हे थोर दत्तभक्त आणि उच्च कोटीचे साधक. त्यांनी संजीवन चिकित्सा ही उपचार पद्धती शोधून काढली आणि तिच्या प्रसारासाठी सारे आयुष्य वाहून टाकले. वयाच्या बाहत्तराव्या वर्षी प्रत्यक्ष श्रीदत्तात्रेयांनी त्यांना संन्यास दीक्षा दिली. मात्र त्या वेळी विरजाहोमादी कोणतेच विधी झाले नव्हते. जानवे आणि शिखा तशीच होती. भगवी वस्त्रेही देण्यात आली नव्हती. नंतर सुमारे पाऊण महिन्याने श्रीमहाराज त्यांच्या घरी गेले व दादांना म्हणाले, ''ही भगवी वस्त्रे माझे सद्गुरू श्रीबाबा महाराज सहस्रबुद्धे यांचेकडून आली आहेत, ती परिधान करा. तसेच गोप्रदान करण्याचे राहून गेले आहे, त्यासाठी तेथून सव्वा-सव्वा रुपयाची पाच गोप्रदाने आली आहेत, ती घेऊन समंत्रक गोप्रदाने करा.'' त्याप्रमाणे करताच दादांचे जानवे व शिखा गळून पडली. त्यानंतर वैशाख व ।। चतुर्दशी, शक १८७६ या दिवशी दादांनी आपल्या नियोजित समाधिस्थानी सिद्धासन घालून ब्रह्मांडी प्राण नेऊन तात्काळ देहत्याग केला. त्या प्रसंगी श्रीमहाराज तेथे स्वत: उपस्थित होते आणि त्यानीच पार्थिव देहावर सर्वप्रथम मूठमाती अर्पण केली.


◆◆◆







श्री. विनायक केशव ऊर्फ दत्तोपंत जोशी



श्री. रघुनाथ केशव जोशी

## श्री. रघुनाथ केशव जोशी यांना अनुग्रह

"...१९४९ साली श्रीमहाराजांची पावसच्या श्रीस्वामी स्वरूपानंदांशी प्रथम भेट झाली आणि त्यानंतर वारंवार गाठी-भेटी होऊ लागल्या. रत्नागिरीचे श्री. विनायक केशव ऊर्फ दत्तोपंत जोशी आणि त्यांचे मामलेदार बंधू श्री. रघुनाथ केशव जोशी (श्रीकाका महाराजांचे वडील) आणि त्यांचे जिवलग स्नेही, खानूचे श्री. रामचंद्र गोविंद तथा बापुराव खांडेकर हे तिघे जण त्या वेळी आध्यात्मिक जिज्ञासेने श्रीमहाराजांच्या रत्नागिरी येथील घरी किंवा पावसला स्वामी स्वरूपानंदांकडे वारंवार दर्शनासाठी येत असत. या तिघांचे महाराजांशी अत्यंत घनिष्ठ असे नाते निर्माण झाले. काही दिवस श्रीमहाराज दत्तोपंतांच्या घरी वास्तव्यालाही होते.


दत्तोपंत आणि बापुराव यांना श्रीमहाराजांकडून अनुग्रह घ्यायची इच्छा होती. श्रीमहाराज फक्त रघुनाथरावांनाच अनुग्रह देऊ इच्छित होते आणि रघुनाथराव तर सरकारी नोकरीत जबाबदारीच्या जागेवर असल्यामुळे अनुग्रह स्वीकारण्यास फारसे अनुकूल नव्हते.

एकदा पावसला हे सारे जण स्वरूपानंदांकडे जमले असता या विषयाची पुन्हा चर्चा झाली; त्या वेळी स्वरूपानंदांनी रघुनाथरावांना समजाविले की श्रीमहाराजांकडून अनुग्रह मिळण्यासाठी पूर्व पुण्याई लागते. तो अलभ्य लाभ आहे आणि त्याच दिवशी श्रीमहाराजांनी त्या तिघांनाही स्वामी स्वरूपानंदांच्यासमोर अनुग्रह दिला.










## गुरूची अंगठी गुरूच्या बोटात घातली

...सन १९५३ मधे विठोबा श्रीसद्गुरू बाबांकडे ४ जुलै रोजी अत्यंत अडचणी सहन करून आला. ६ दिवस बाबांचे व त्याचे प्रेमाचे भांडण झाले कारण श्रीसद्गुरू बाबा ३१ जुलै १९५३ रोजी रात्री देह ठेवणार होते. हे विठोबास त्यानी अगोदर ३ वर्षे कळविले होते. विठोबाने हट्ट धरला. मी तुमचे आधी देह ठेवणार. नाही तर तुम्ही थांबले पाहिजे. शेवटी श्रीसद्गुरूने थांबण्याचे कबूल केले. किती थांबू हे विठोबास विचारले व त्यांच्याच इच्छेने विठोबाचे तोंडून १ वर्ष असा शब्द गेला. नंतर सद्गुरू म्हणाले आता तू माझ्या कार्याकरीतां राहिले पाहिजेस. विठोबाला सद्गुरूने बांधून अडकवून घेतले. २४ जुलै १९५४ (१९५३) रोजी सद्गुरूंनी आपल्या हातातील गुरूच्या बोटातील सर्पमुखी आंगठी व चांदीचें वळे विठोबाच्या हातात उजव्या गुरूच्या बोटात घातलें. गुरुपौर्णिमेस विठोबाने आणलेल्या खडावा १५ ते २० मिनिटे पायात घालून विठोबाकडून संपूर्ण पूजा करून घेतली व खडावा, गळ्यातील गुलाबाचा हार माळ व आपला व आईसाहेब (मंडळींचा) फोटो प्रसाद म्हणून दिला.

त्याच दिवशी श्री सद्गुरूने विठोबाचे विनंतीप्रमाणे व हट्टाप्रमाणे विठोबाला सांगीतले कीं, विठोबा तुझा सर्व अहंकार मी घेतला. आता या पुढे तू कांही करावयाचे नाहिस. तुझे सर्व मी करीन. तूं अमेरिकेत इंगलंडांत जा, पृथ्वीचे पाठीवर कोठेही जा त्या ठिकाणी मी तुझ्या पाठीशी उभा आहे. १ वर्षात सर्व संपव. पुढे मठाच्या ऑर्डरस् आहेत. जमिन चांगली बघून माझ्या नांवाने क्वचित दाणा टाकीत जा. संपूर्ण कृपा करून दृढालिंगन देऊन पूर्ण आशीर्वाद दिला.....''

(श्रीमहाराजांच्या हस्तलिखितातून)



सुरू होत असतात. संध्या रोज रुद्र, पवमान, सौर, गणपति
अथर्वशीर्ष, श्रीसूक्त व सप्तशतीपाठ रोज होत असतो. १९४८
नवचंडी सहस्त्रावर्तने हवन केले. दारिवर उत्सव १९४८
शतचंडी हवन सुरू १९४९ पवमान, लघुविष्णुयाग हवनासह
गुरुचरित्र, व गुरुलीलामृत मिळून ५२ पारायणे दरवर्षी
होतात. १९५० नवग्रह जप व हवन १९५१ अष्टग्रहीत सौर सूक्त
हवन १९५२ महामृत्युंजय जप व लक्षजपानंतर हवन. संध्या
मन्युसूक्त पाठ ४० हजार गुरुचरित्र, गुरुलीलामृत
नवनाथ, पारायणे सुरू आहेत. दरमहिन्यात प्रत्येक ग्रंथाची
उपासना होतात. १९५८ ओव्हरसीयर मुंबई भाविकांनी
शिष्यांनी सत्कार केला व पुरस्कार ८८८ रुपयांची
थैली दिली. त्यांचा विनियोग मठ बांधण्यात व स्थानांचा
उपयोग करण्यात केला. १९६० ने. आर. बाध
ट्रस्ट. ३५ सी. विकोबाने खरेदी केला व त्यांनी
३०x६१ इतकी जागा सद्गुरु यांचे मुखास समाधी करिता
बक्षीस दिली. १९६४ सालात डी. ई. सोसायटी कडून
म्हणजे फर्ग्युसन कॉलेज कडून १३०x१८ एवढी जागा
समाधी लगत खरेदी केली व तिही जागा समाधी स्थाना
साठी आवश्यक म्हणून रजिस्टर बक्षीस पत्राने सद्गुरूंच्या
मुलीस बक्षीस दिली. १९६८ मध्ये - ओ. के. आर. बाध
आणि बिडकरांच्या त्यांना प्लॉट ३२ बी हा खरेदी देण्याचा
तोंडी करार केला. किंमत ११००० रु. ठरली व त्याच्याबरोबर
कंपाऊंड घातले. १९७९ व १९८० मध्ये गाळा व दुरुस्ती
पाणी भर घातली. प्लॉट सी. बी. मध्ये बाग व
आणि पाळण्याची जागा तयार केली. सभामंडप करण्याचा
केली. प्लॉट सी. बी. डी. सर्व बाजूने [illegible] कंपाऊंड

# तो आता कायमचा बाजूला सरला !

श्रीसद्गुरू बाबा महाराज सहस्रबुद्धे यांनी आपण आता देह सोडणार असे आपल्या शिष्यवर्गाला आधीच सूचित केले होते. दि. ३१ जुलै १९५३ रोजी मध्यरात्री बारा वाजून अठ्ठावीस मिनिटे ही वेळ त्यांनी देह त्यागासाठी नक्की केली. श्रीमहाराज सद्गुरूंच्या वियोगाच्या कल्पनेनेच एवढे अस्वस्थ झाले की ते रत्नागिरीहून पुण्याला निघून आले आणि त्यांनी श्रीबाबांसमोर धरणेच धरले. सतत सहा दिवस उभयतांमध्ये वाद चालू होता. अखेरीला श्रीमहाराजांचा शुद्ध भाव, निस्सीम प्रेम आणि मनाची झालेली विकल अवस्था पाहून श्रीबाबांनी आणखी एक वर्ष देह न सोडण्याचे वचन दिले. यानंतर दि. २४ जुलै १९५३ रोजी श्रीबाबांनी आपल्या हातातील अंगठी आणि वळे श्रीमहाराजांच्या हातात घालून ''गुरूच्या बोटातील अंगठी गुरूच्या बोटात घातली'' असे सूचक उद्गार काढले. दि. २६ जुलैला गुरुपौर्णिमेच्या दिवशी श्रीमहाराजांनी श्रीबाबांची षोडशोपचारे पूजा केली. श्रीबाबांनी त्यांचा उजवा हात हाती घेऊन आवेगपूर्ण स्वरात सांगितले, ''विठोबा, आजपासून तुझा सर्व अहंकार मी घेतला. तुझे सर्व काही इत:पर मीच करणार आहे हे ध्यानात धर !'' त्यानंतर श्रीबाबांनी खोली बाहेर लावलेली 'शिवनाम थोर शंकर नाम सुधा।' ही पाटी काढण्यास सांगितली. पाटीचा अर्थ ध्यानी घेऊन श्रीमहाराजांनी श्रीबीडकर मठात श्रीशंकरावर रुद्राभिषेक सुरू केला. सर्व भक्तजनांना शिवनामाचा जप करण्याचे आवाहन केले. स्वत:ही आराधना सुरू केली.

अजूनही बाबा 'मी जाणार' असे म्हणत. त्यामुळे मनात आशंका होती. ३१ जुलैच्या रात्री बीडकर मठात अनेक निकटचे भक्तगण जमून देवाला साकडे घालीत होते. अखेरीस ती वेळ टळून गेली. रात्रौचे साडेबारा वाजून गेले. श्रीमहाराज आणि न. भा. काळे हे बाबांचे सेवक धावतच धुमाळ बिल्डिंगमध्ये श्रीबाबांच्या घरी येऊन त्यांनी अधीरपणे दरवाजा वाजविला. खुद्द बाबांनीच तो उघडला. दारात श्रीबाबा प्रसन्न मुद्रेने उभे होते. ते साक्षात स्वामी समर्थच भासत होते. त्यांनी आलिंगनासाठी हात पसरून काळे यांना बोलावले, परंतु काळे संकोचून बाजूस सरले. श्रीबाबांनी पुढे होऊन श्रीमहाराजांना दृढ आलिंगन दिले व म्हणाले, ''हे असे होणार हे मला माहीत होते, म्हणूनच मी तुला बोलावले. तो आता कायमचा बाजूला सरला !''

◆◆◆